
# महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेची स्थापना

- शासकीय परीक्षा घेण्यासाठी शासकीय मंडळाची स्थापना सन 1968 मध्ये करण्यात आली.
- शासकीय परीक्षा मंडळाचे रुपांतर महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद या स्वायत्त संस्थेत करण्याचे विधेयक डिसेंबर 1998 च्या विधिमंडळात मंजूर झाले.
- महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद अधिनियम 1998 दि. 15/08/2002 पासून लागू करण्याची अधिसूचना दि. 12/08/2002 साली प्रसिद्ध झाली.
- शासन निर्णय दि. 07/12/2017 अन्वये परीक्षा परिषदेच्या विविध समित्यांमध्ये नामनिर्देशित सदस्यांचा समावेश करण्यात आला.
- महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या समित्या - महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद अधिनियम 1998 नुसार राज्य समिती, कार्यकारी समिती, परीक्षा समिती, वित्त समिती, विद्या समिती इ. समित्यांमार्फत परीक्षा परिषदेचे कामकाज चालते. शालेय शिक्षण व क्रीडा विभागाची अधिसूचना दि. 18/02/2020 अन्वये नामनिर्देशित सदस्यांची नियुक्ती रद्द झालेली असल्याने सद्य:स्थितीत उपरोक्त नमूद सर्व समित्या बरखास्त झालेल्या आहेत व **महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेचे कामकाज राज्य परिषद समिती (तदर्थ समिती) मार्फत चालविण्यात येते**.

# महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे

(Organization Chart)



# ठळक वैशिष्टये

- महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या वतीने वर्षभरात घेण्यात येणाऱ्या विविध परीक्षांचे आयोजन करुन विविध स्तरावरील अधिकारी यांचे सहकार्याने सन 2002 पासून यशस्वीरित्या परीक्षा पार पाडण्यात आल्या असून त्या परीक्षा संदर्भातील गोपनीयता सातत्याने राखण्यात आली आहे.
- **महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेमार्फत घेण्यात येणारे परीक्षा शुल्क हे यशस्वीरित्या संगणकीय पद्धतीने (ऑनलाईन) स्विकारण्यात येत असून त्याचे कोणतेही बँक चार्जेस विद्यार्थ्यांकडून आकारले जात नाहीत.**
- महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेस कोणत्याही प्रकारचे शासकीय अनुदान वेतन व वेतनेतर बाबींकरीता मिळत नसून परिषदेमार्फत घेतल्या जाणाऱ्या विविध परीक्षांच्या परीक्षा शुल्कामधून प्राप्त होणाऱ्या जमा रकमेतून परिषदेचा सर्व खर्च (कार्यालयीन खर्चासहित) भागविला जातो.
- परीक्षा संदर्भात लागणारी साधन सामग्री व सेवा या बाबींवर होणारा खर्च हा लेखासंहितामध्ये दिलेल्या सूचनांचे तंतोतंत पालन करुन शासनाने दिलेल्या वित्तीय नियमांचा अवलंब केला जातो.

# महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेत कार्यरत अधिकारी

| अ.क्र. | पदनाम | कार्यरत अधिकारी |
|---|---|---|
| १ | अध्यक्ष | डॉ. महेश पालकर,(अतिरिक्त कार्यभार) |
| २ | आयुक्त | श्रीम. अनुराधा ओक (अतिरिक्त कार्यभार) |
| ३ | उपायुक्त | श्री. संजयकुमार राठोड |
| ४ | सहायक आयुक्त | श्री. धनाजी बुटे |
| ५ | सहायक आयुक्त | श्री. मारुती फडके |
| ६ | सहायक आयुक्त | श्रीम. मंगला वाव्हळ |
| ७ | अधीक्षक | श्रीम. सीमा रांगडे |
| ८ | अधीक्षक | श्री. हेमंत वाटाडे |
| ९ | अधीक्षक | श्री. संतोष जैन |
| १० | अधीक्षक | श्रीम. सुजाता भगत |
| ११ | अधीक्षक | श्रीम. अर्चना सरदार |
| १२ | लेखाधिकारी | श्रीम. संगिता चव्हाण (प्रतिनियुक्तीने) |

# परीक्षा परिषदेमार्फत घेण्यात येणा-या परीक्षा

| अ.क्र. | परीक्षेचे नाव |
|---|---|
| 1 | DTED/ D.EL.ED EXAM |
| 2 | EXTERNAL EXAM |
| 3 | TET EXAM |
| 4 | GCC EXAM |
| 5 | GCC-TBC EXAM |
| 6 | NTS/ NMMS EXAM |
| 7 | DEPARTMENTAL EXAM |
| 8 | RIMC EXAM |
| 9 | PUP/ PSS EXAM |

## महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,पुणे

**१. योजनेचे नाव व प्रस्तावाना**

: महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,पुणे मार्फत एकूण १२ प्रकारच्या परीक्षा घेतल्या जातात त्यांचा तपशील खालीलप्रमाणे.

१. पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवत्ती परीक्षा (इयत्ता ५वी )
   पूर्व माध्यमिक शिष्यवत्ती परीक्षा (इयत्ता ८वी )

२. (अ )अध्यापक शिक्षण पदविका परीक्षा अभ्यासक्रम २००४
   (ब) प्राथमिक शिक्षण पदविका डी एल एड अभ्यासक्रम २०१६ नवीन अभ्यासक्रम

३. राष्ट्रीय प्रज्ञाशोध परीक्षा राज्यस्तर इयत्ता १०वी (एनटीस)

४. राष्ट्रीय इंडीयन मिलीटरी कॉलेज,डेहराडून प्रवेश परीक्षा (आर.आय.एम.सी. )

५. विभागीय सेवा प्रवेशोत्तर परीक्षा

६. शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र परीक्षा मॅन्युअल टंकलेखन,संगणक टंकलेखन

७. ट्रेन टिचर्ससर्टिफिकेट परीक्षा (टी.टी.सी.)

८. राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक विदयार्थी शिष्यवत्ती योजना परीक्षा  इयत्ती ८वी (एन.एम.एम.स)

९. शिक्षक पात्रता परीक्षा (टी.ई.टी.)

१०. शिक्षक अभियोग्यता व बुध्दीमत्ता चाचणी टिअेआयटी

११. बाहय परीक्षा विभाग

या व्यतिरिक्त महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,अधिनियम २००२ मधील कलम २३ २ नुसार परिषदेने मान्य केलेल्या अटी व शर्तीनुसार इतर विभागाच्या परीक्षांचे परिषदेमार्फत आयोजन केले जाते.

या सर्व परीक्षांचे संचलन राज्यातील विविध शैक्षणिक संस्था,शिक्षणाधिकारी, व विभागीय शिक्षण उपसंचालक यांच्या सहकार्याने केले जाते. परिषदेच्या सर्व परीक्षांचे नियमितपणे मुल्यमापन केले जाऊन परीक्षांच्या कार्यपध्दतीत आवश्यक त्या सुधारणा केल्या जातात.

**२. योजना/कार्यक्रमाचे स्वरुप/माहिती व व्यापती**

: या परीक्षाचे संचलन परीक्षा परिषदे मार्फतच केले जाते. परीक्षा क्षेत्रीयस्तरावर जिल्हा शिक्षणाधिकारी व शिक्षण निरिक्षक,बृहन्मुंबई (उ/प/द) यांचे मार्फत घेतल्या जातात आरएमसी ही परीक्षा वर्षातून दोनवेळा राज्यस्तरावर घेण्यात येते. शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र परीक्षा व डी टीएड डीएलएड या परीक्षा वर्षातून दोनदा घेतल्या जातात. या व्यतिरिक्त इतर सर्व परीक्षा वर्षातून एकदा घेतल्या जातात.

**३. योजनेचा उददेश** : प्राथमिक/माध्यमिक स्तरावरील गुणवान विदयार्थ्यांचा शोध घेऊन स्पर्धा परीक्षांच्या माध्यमातून त्यांच्या सुप्तगुणांना वाव देणे,डी टी.एड./ डी.एल.एड./ टी.टी.सी./टी.ई.टी /टी.आय.एटी. जीसीसी/ परीक्षांमधून भावी शिक्षक व लिपीक स्वर्गीय सक्षम मनुष्यबळ निर्माण करण्याकरिता आवश्यक अर्हता मिळवून देणे या परीक्षांचे मुख्य उददेश आहेत. तसेच आर.आय.एम.सी. परीक्षेतून यशस्वी विदयार्थीना आर.आय.एम.सी. डेहराडून येथे ८ वी साठी प्रवेश मिळतो.

**४.अंमलबजावणी यंत्रणा** : शिक्षणाधिकारी प्राथमिक/माध्यमिक शिक्षण निरिक्षक (बहन्मुंबई) यांचे मार्फत क्षेत्रीय स्तरावर या परीक्षा घेतल्या जातात. विभागीय शिक्षण उपसंचालक व महाराष्ट्र राज्य परीक्षेद्वारे या परीक्षांचे नियंत्रण केले जाते.